# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव

## आस्थापना विभाग

## जाहिर प्रसिध्दीकरण

### ई-निविदा सुचना क्र.आस्था./०१/२०२२-२३

### <u>ई-निविदा फॉर्म</u>

**कामाचेनाव : मालेगाव महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-अ, गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील रिक्त पदे सरळसेवेने कायम स्वरुपी भरणे करीता कंपनी नेमणे करीता कंपनीची नियुक्ती करणे.**

---

संपर्क : संगणक/ आस्थापना विभाग, २ रा मजला, महापालिका मुख्यालय, भुईकोट किल्ला समोर, रविवार वार्ड, मालेगाव -४२३२०३, जिल्हा : नाशिक, महाराष्ट्र

(इपीएबीएक्स)(०२५५४)२३१८००/२३१८०१, आयुक्त कार्यालय: २३१९००, फॅक्स:२३०८९४

e-mail: mlgmmc@gmail.com visit us :www.malegaoncorporation.org

# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव.
## आस्थापना विभाग
### जाहिर प्रसिध्दीकरण

## ई-निविदा सुचना क्र.आस्था./०१/२०२२-२३

मालेगाव महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-अ, गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील रिक्त पदे सरळ सेवेने कायम स्वरुपी भरणे करीता कंपनी नेमणे करीता कंपनीची नियुक्ती करावयाची आहे. सदर कामाची निविदा मान्यता प्राप्त कंपनीकडून केवळ ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन दोन लिफाफा) पध्दती नेमागविण्यात येत आहे. सदर ई-निविदा सुचना मा. शासनाच्या https//www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.निविदेच्या विस्तृत नमुना, कामासंबंधी संपुर्ण माहिती, निविदा फॉर्म रक्कम, बयाणा रक्कम, एकुण अटी शर्ती, निविदा प्रपत्र विक्री, दाखल करणेचा दिनांक, निविदा उघडणे इ. आवश्यक माहिती वरील संकेतस्थळावर दिनांक ०८/०९/२०२२ पासुन उपलब्ध आहे. सदर कामा संदर्भात आवश्यक ती माहिती आस्थापना विभाग, म.न.पा. मुख्य कार्यालय, मालेगाव, जि. नाशिक यांचेकडुन प्राप्त करता येईल.

(भालचंद्र गोसावी)
महानगरपालिका आयुक्त
मालेगावमहानगरपालिका, मालेगाव.

जा.क्र.मामनपा/आस्था/८५८/२२
दिनांक : ०६/०९/२०२२

Malegaon Municipal Corporation, Malegaon
Establishment Department
e-Tender Notice No. MMC/Est./01/2022-23

Malegaon Municipal Corporation invites e-tender from the approved reputed companies only, through e-tendering (online two envelope) system for the work of **"Appointment of a company for the process of permanent recruitment by direct servicefor various vacant posts in Group-A, Group-B (Non-Gazetted), Group-C and Group-D atthe establishment of MMC"**. The detailed e-tender notice has been published on the website **https//www.mahatenders.gov.in**. Detailed tender notice, complete information regarding work, tender form amount, earnest money, entire terms and conditions, tender form sale, date of submission, opening of tender etc. all required information is made available at the above website from 08/09/2022 onwards. The necessary information in connection with the said work, may be obtained from Establishment Department, MMC Head Office, Malegaon, Dist. Nashik.

(Bhalchandra Gosavi)
MUNICIPAL COMMISSIONER
Malegaon Municipal Corporation, Dist. Nashik, MS

O.No.MMC/Est/858/22
Date : 06/08/2022

# मालेगाव महानगरपालिका, मालेगाव.
## आस्थापना विभाग

# ई-निविदा सुचना क्र.आस्था./०१/२०२२-२३

सविस्तर ई-निविदा सुचना

| कामाचेनाव | बयाणा रक्कम रुपये | निविदा नमुना रक्कम रुपये |
|---|---|---|
| मालेगाव महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील गट-अ, गट-ब (अराजपत्रित), गट-क व गट-ड मधील रिक्त पदे सरळ सेवेने कायम स्वरुपी भरणे करीता कंपनी नेमणे करीता कंपनीची नियुक्ती करणे. | २५,०००/- | ५,१९०+ ९३४ (१८% GST) = एकुण रु. ६१२४/- |

### ई-निविदा प्रसिध्दीकरणाचा तपशील

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दि. ०८/०९/२०२२ |
| ई-निविदा दस्तऐवज लोड प्रारंभ | दि. ०८/०९/२०२२ सकाळी १०.०० वा. पासुन |
| ई-निविदा दस्तऐवज डाऊनलोड | दि. ०८/०९/२०२२ सकाळी १०.०५ वा. पासुन |
| ई-निविदा पूर्व बैठक (pre bid meeting) | दि. १९/०९/२०२२ दुपारी ०४.०० वाजता (आयुक्त कार्यालय, महापालिका मुख्यालय येथे) |
| ई-निविदा दाखल करण्याची सुरुवात | दि. ०८/०९/२०२२ सकाळी १०.३० वा. पासुन |
| ई-निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख व वेळ | दि. ०३/१०/२०२२ दुपारी ०५.०० वाजे पर्यंत |
| ई-निविदा उघडण्याची दिनांक | दि. ०७/१०/२०२२ दुपारी १२.०० वाजता (शक्य झाल्यास) |

सदर ई-निविदेसाठी निविदा किंमत व बयाणा रक्कम https//www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहे.

**निविदेच्या अटी/शर्ती :**

| A) | **ई-निविदेच्या कामा संदर्भात विशेष अटी/शर्ती (Special Terms & Conditions):** |
|---|---|
| | १) संबंधित कंपनीस महाराष्ट्रासह इतर दोन राज्यात व केंद्र शासना कडील शासकीय/ निम शासकीय पद भरतीच्या स्पर्धा परिक्षा राबविण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा. |
| | २) संबंधित कंपनीस किमान ५,००,०००/- उमेदवारांसाठी स्पर्धा परीक्षा राबविण्याचा अनुभव असावा. |
| | ३) संबंधित कंपनीचे नांव मागील ५ वर्षात कोणत्याही राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या कोणत्याही विभागाच्या काळ्या यादीत नसावे. |
| | ४) स्पर्धा परीक्षा आयोजनासाठी संबंधित कंपनीने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी परीक्षा आयोजित करण्याची क्षमता असल्याचे प्रमाणित करणे गरजेचे राहील. |
| | ५) स्पर्धा परीक्षेच्या सुरक्षेच्या दृष्टिने आवश्यक त्या सर्व तांत्रिक बाबीची कंपनीने पूर्तता करणे आवश्यक राहील. |
| | ६) स्पर्धा परिक्षा अत्यंत पारदर्शकपणे, विश्वासार्ह, गोपनीयता बाळगून, सुरक्षितरित्या व सुलभतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर सर्व उपाय योजना करण्याची क्षमता कंपनीकडे असावी. |
| | ७) निविदेतील कामाचे दर हे प्रति उमेदवारासाठी सर्व करासहित द्यावयाचे आहेत. |
| | ८) संबंधित कंपनीचे मालेगाव महानगरपालिके मधील कुठल्याही अधिकारी/ कर्मचाऱ्यांशी हित संबंध नाहीत, या बाबतचे रु.१००/- चे स्टँप पेपरवर प्रतिज्ञालेख सादर करणे आवश्यक राहील. |

| | |
|---|---|
| | ९) निविदा करणारी कंपनीचे कोणत्याही राजकीय पक्षाशी अथवा संघटनाशी संबंध असता कामा नये. |
| | १०) मालेगाव महानगरपालिकेने विहीत केलेल्या शर्ती व अटी मान्य असले बाबत विहीत रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र कंपनीने करुनदेणे बंधनकारक राहील. |
| | ११) कंपनीने कार्यादेशानुसार विना विलंब काम पूर्ण करावयाचे आहे. तसेच करारपत्र लिहून दिल्या नंतर ठरलेली मुदत संपुष्टात येई पर्यंत कंपनीने काम चालू ठेवणे बंधनकारक राहील. चालू परिस्थीती मधून काम बंद केल्यास किंवा अर्धवट सोडल्यास होणाऱ्या कारवाईस व नुकसानीस कंपनीस जबाबदार धरणेत येईल. |
| | १२) म. शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रं.प्रानिमं १२२२/प्र.क्रं.५४/का.१३-अ, दिनांक ०४/०५/२०२२ मधील परिच्छेद क्रं. ५ व ६ इ. अन्वये पद भरती प्रक्रिया संदर्भात कंपनीच्या निवडी बाबत विहीत निकष मधील एकुण तरतुदी निविदा करणारी कंपनीवर जशाच्या तशा, पुर्णपणे व तंतोतंत लागु राहतील. |
| | १३) निविदा करणारी कंपनीस मालेगाव महानगरपालिकेच्या सुचने नुसार विविध पदां करीता विहीत भरती प्रक्रिया अंतर्गत उमेदवारांकडून प्राप्त झालेले स्पर्धा परीक्षेचे अर्ज स्वीकारणे, त्याची छाननी करणे, आलेल्या अर्ज संकलित करुन अर्हता तपासणीचे परिपुर्ण नियोजन, परीक्षा शुल्क/आवेदन शुल्क ऑनलाईन पद्धतीने स्वीकारणे, अर्जावर योग्य ती प्रक्रिया करुन ऑनलाईन प्रवेशपत्र तयार करणे, विविध केंद्रा वर परिक्षा/ मुलाख्त घेणे, परीक्षा/ मुलाखतचा निकाल तसेच शिफारस झालेल्या व न झालेल्या उमेदवारांच्या याद्या संकेतस्थळावर जाहीर करणे, पद भरती व्यवस्थापन इत्यादी अनुषंगिक बाबी/ कामे पुर्ण करणे बंधनकारक राहील. निविदेत नमूद केलेल्या कामाची व्याप्ती केवळ अंदाजित असुन कोणतेही कारण न देता कामाची व्याप्ती वाढवण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार आयुक्त, मालेगाव महानगरपालिका यांनी राखून ठेवलेले आहेत. |
| | १४) प्रस्तुत ई-निविदांतर्गत कामांसाठी आवश्यक्ते प्रमाणे आयुक्त, मालेगाव महानगरपालिका परिशिष्ट/ शुध्दीपत्र जारी करून निविदा कागदपत्रांमध्ये निविदा विक्रीच्या अंतिम मुदतीपूर्वी कधीही सुधारणा करू शकतात. कोणतीही परिशिष्ट / शुध्दीपत्र तसेच अशा प्रकारे जारी केलेले स्पष्टीकरण हे निविदा दस्तऐवजांचा एक भाग असेल आणि असे गृहीत धरले जाईल की दुरुस्तीमध्ये समाविष्ट असलेली माहिती निविदाकाराने त्याच्या निविदेमध्ये विचारात घेतली असेल. |
| | १५) संभाव्य निविदाकाराला त्यांच्या ई-निविदा तयार करताना दुरुस्ती विचारात घेण्यासाठी वाजवी वेळ देण्यासाठी ई-निविदा सादर करण्याची अंतिम मुदत वाढविण्याचा अधिकार आयुक्त, मालेगाव महानगरपालिका यांना राहील. अशा परिस्थितीत, विस्तारित मुदतीच्या संदर्भात तपशील महापालिकेद्वारे वेबसाइटवर प्रसिध्द करण्यात येईल. |
| | १६) निविदा सादर करणारी कंपनी / मक्तेदाराने खालील प्रमाणे तीन पध्दतीने दर फक्त ऑनलाईन स्वरुपात सादर करावयाचे आहेत.<br><br>I) मालेगाव महानगरपालिकेच्या सुचने नुसार विविध पदां करीता विहीत भरती प्रक्रिया अंतर्गत उमेदवारांकडून प्राप्त झालेले अर्ज स्वीकारणे, त्याची छाननी करणे, आलेल्या अर्ज संकलित करुन अर्हता तपासणीचे परिपुर्ण नियोजन, परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने स्वीकारणे, अर्जावर योग्य ती प्रक्रिया करुन ऑनलाईन प्रवेशपत्र तयार करणे, महापालिकेच्या सुचनेनुसार विविध केंद्रावर परिक्षा घेणे, परीक्षेचा निकाल तसेच शिफारस झालेल्या व न झालेल्या उमेदवारांच्या याद्या संकेतस्थळावर जाहीर करणे,पद भरती व्यवस्थापन इत्यादी अनुषंगिक बाबी/कामे पुर्ण करणे, स्पर्धा परिक्षेसाठी प्रश्न संच तयार करणे, मनपाकडुन प्राप्त सुचनेनुसार इतर संबंधित कामे पार पाडणे इत्यादी कामांसाठी प्रति उमेदवारासाठी सर्व करासहित दर सादर करणे.<br><br>**II)** मालेगाव महानगरपालिकेच्या सुचने नुसार विविध पदां करीता विहीत भरती प्रक्रिया अंतर्गत उमेदवारांकडून प्राप्त झालेले अर्ज स्वीकारणे, त्याची छाननी करणे, आलेल्या अर्ज संकलित |

| | |
|---|---|
| | करुन अर्हता तपासणीचे परिपुर्ण नियोजन, परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने स्वीकारणे, अर्जावर योग्य ती प्रक्रिया करुन ऑनलाईन प्रवेशपत्र तयार करणे, महापालिकेच्या सुचनेनुसार विविध केंद्रावर परिक्षा घेणे, परीक्षेचा निकाल तसेच शिफारस झालेल्या व न झालेल्या उमेदवारांच्या याद्या संकेतस्थळावर जाहीर करणे,पद भरती व्यवस्थापन इत्यादी अनुषंगिक बाबी/कामे पुर्ण करणे, स्पर्धा परिक्षेसाठी प्रश्न संच तयार करणे, मनपाकडुन प्राप्त सुचनेनुसार इतर संबंधित कामे पार पाडणे इत्यादी कामांसाठी प्रति उमेदवारासाठी सर्व करासहित दर सादर करणे. **(प्रश्न पत्रिका तयार करणे हा घटक वगळुन)**<br><br>**III)** मालेगाव महानगरपालिकेच्या सुचने नुसार विविध पदां करीता विहीत भरती प्रक्रिया अंतर्गत उमेदवारांकडून प्राप्त झालेले अर्ज स्वीकारणे, त्याची छाननी करणे, आलेल्या अर्ज संकलित करुन अर्हता तपासणीचे परिपुर्ण नियोजन, आवेदन शुल्क ऑनलाईन पद्धतीने स्वीकारणे, अर्जावर योग्य ती प्रक्रिया करुन ऑनलाईन प्रवेशपत्र तयार करणे, महापालिकेच्या सुचनेनुसार विविध केंद्रावर फक्त मुलाखत घेणे संदर्भात परिपुर्ण नियोजन करणे, एकुण प्रक्रिया अंती निकाल तसेच शिफारस झालेल्या व न झालेल्या उमेदवारांच्या याद्या संकेतस्थळावर जाहीर करणे, पद भरती व्यवस्थापन इत्यादी अनुषंगिक बाबी/ कामे पुर्ण करणे, मनपाकडुन प्राप्त सुचनेनुसार इतर संबंधित कामे पार पाडणे इत्यादी कामांसाठी प्रति उमेदवारासाठी सर्व करासहित दर सादर करणे. |
| **B)** | **ई-निविदा सर्वसाधारण अटी/ शर्ती (General Terms & Conditions) :** |
| | १) सदर निविदा मा. शासनाच्या https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून ऑनलाईन खरेदी करता येईल. निविदा संबधची सर्व माहिती व अटी/ शर्ती सदर संकेतस्थळावरून पाहण्यासाठी उपलब्ध आहे. सदर निविदा फक्त ऑनलाईन खरेदी करता येईल व ऑनलाईन भरता/ दाखल करता येईल. सर्व मान्यताप्राप्त संस्था/ कंपनी/ मक्तेदार यांनी Digital Signature रजिस्ट्रेशन/ रिनीवल करणे आवश्यक आहे.<br>निविदेचा तपशील मालेगाव महानगापालिकेच्या www.malegaoncorporation.org या संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध आहे. |
| | २) नोंदणीकृत कंत्राटदाराने अधिकृत डी. एस. सी. प्राप्त करुन घेऊन महाराष्ट्र शासनाच्या https://www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर स्वतः नोंदणी करून केवळ ई-निविदा पध्दतीने निविदा सादर करावे. |
| | ३) संकेत स्थळावरुन निविदा मध्ये सहभागी होण्यासाठी संकेतस्थळावर युजर आय. डी. व पासवर्ड बनविणे बंधनकारक आहे. यासाठी किंवा ई-निविदाबाबत मार्गदर्शनासाठी 0120-4001002, 0120-4001005, 0120-6277787 या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच ई-मेल सपोर्ट support-eproc@nic.in हया मेलवर संपर्क करावे. |
| | ४) ऑनलाईन ई-निविदा सादरीकरण हे दोन लिफाफा पध्दतीने असतील.<br>a) तांत्रिक लिफाफा (Technical Bid) : यामध्ये प्रस्तुत ई-निविदेत मागणी केलेली सर्व कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे.<br>b) दरपत्रक लिफाफा (Commercial Bid): यामध्ये प्रस्तुत ई-निविदेत नमुद एकुण कामांकरीता द्यावयाचे दर सादर करणे आवश्यक आहे. |
| | ५) निविदा सादरीकरण / स्विकृती फक्त ऑनलाईन पध्दतीने करणेत येतील. पेटी पध्दत बंद करणेत आलेली आहे. |
| | ६) कोणतेही निविदा स्विकारणे वा नाकारणेचा अधिकार मा. आयुक्त, मालेगाव महानगरपालिका यांनी राखुन ठेवला आहे. |
| | ७) एखादी महत्वाची अट/शर्त अपलोड निविदा प्रपत्रात नजरचुकीने अथवा अनावधानाने समाविष्ट करावयाची राहिल्यास "Ammendment" किंवा शुध्दीपत्रक म्हणून जास्तीचे सुधारणा प्रपत्र निविदा प्रपत्रात समाविष्ट करण्यात येईल व सदर सुधारणेची प्रत वरील नमुद शासकिय संकेतस्थळावर अपलोड करण्यात |

| | |
|---|---|
| | येईल. निविदा धारकांनी याची नोंद घ्यावी. |
| | ८) प्रस्तुत ई-निविदेची पुढील सर्व काही शुध्दीपत्रके इ. वरील महाराष्ट्र शासनाच्या https//www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर विहीत कालावधी पर्यंत उपलब्ध राहतील. |
| | ९) एखादया कंपनी / मक्तेदारांनी किंवा कंत्राटदारांनी खोटी / बनावट कागदपत्रे तांत्रिक लिफाफ्यास जोडून निविदा मिळविण्याचे / निविदा प्रकियेत भाग घेतल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित कंपनीस नोटीस देऊन काळया यादीत टाकणे बाबत अहवाल सादर करण्यात येईल. व सदर अहवाला बाबत म. शासनास कळविण्यात येईल. |
| | १०) ई-निविदा सादर केल्यानंतर त्याच निविदेतील फक्त लिफाफा क्रं. ०१ ची हार्डकॉपी (**संकेतस्थळावरील फक्त तांत्रिक लिफाफ्या मधील सादर केलेले एकुण कागद पत्र/प्रमाणपत्रांचा साक्षांकित संच**) पुढील ४८ तासात आस्थापना विभाग, मालेगाव महानगरपालिका येथे सादर करणे अनिवार्य आहे. |
| | ११) ई-निविदा उघडण्याच्या अखेरच्या दिवशी कार्यालयीन सुटटी असल्यास निविदा पुढील कार्यालयीन दिनांकास उघडण्यात येईल. |
| | १२) प्रस्तुत ई-निविदा अंती निवड झालेली कंपनी/ मक्तेदाराने कामाचे मुदतीत कामपुर्ण करणे बंधनकारक राहील. मुदतीत/ वाढीव मुदतीत काम पुर्ण न केल्यास करार नाम्यात निर्धारीत केल्याप्रमाणे दंडाची रक्कम वसूल करण्यात येईल. |
| | १३) ई-निविदेतील कामे व इत्यादीच्या सुरक्षिततेची पूर्ण व्यवस्था कंपनी/ मक्तेदारांने स्वत:करावी. |
| | १४) अटीयुक्त निविदा विचारात घेतला जाणार नाही. |
| | १५) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकाची राहील. |
| | १६) प्रस्तुत ई- निविदेच्या कामा संदर्भात मा.आयुक्त यांचे प्रशासकिय मंजुरीत नमुद अटी व शर्ती, कंपनी/ मक्तेदारावर बंधनकारक राहील. |
| | १७) मक्तेदारास महापालिकेने करारनामा पत्र दिल्यास ३ दिवसांच्या आत निविदेच्या किमतीनुसार आवश्यकत्या मुद्रांकावर लायक जामिनदाराच्या हमीसह महापालिकेच्या निर्देशाप्रमाणे व अटीशर्ती प्रमाणे विधी तज्ञ यांनी सुचविल्या प्रमाणे करार नामा करुन देणे बंधन कारक राहिल. तसेच महापालिकेकडून करार नामा व कार्यादेशामध्ये आवश्यक ते नुसार महापालिकेचे विधी तज्ञ यांचे तपासणी नुसार अटी व शर्ती वाढविण्यात येतील. |
| | १८) कंपनी/मक्तेदाराने निविदा सादर केल्या वर निविदा मंजुरी पश्चात देण्यात येणा-या करारनामा पत्रा नुसार करार नामा करुन न दिल्यास संबंधित कंपनी/ मक्तेदाराची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल आणि काम दुस-या कंपनी/ मक्तेदाराकडून करुन घेतले जाईल अगर महापालिकेकडून काम करण्याची व्यवस्था करण्यात येईल आणि सदर कंपनी/ मक्तेदाराचे नाव ब्लॅक लिस्ट मध्ये टाकण्यात येईल. तसेच सदरच्या कंपनी/मक्तेदाराला महापालिकेचे कामासाठी कोणतीही निविदा सादर करता येणार नाही. |
| | १९) महापालिकेने वेळो वेळी निर्गमित केलेले आदेश, अटी शर्ती कंपनी/मक्तेदारास बंधनकारक राहतील. त्यानुसार महापालिका अधिकारी कर्मचारी यांनी वेळोवेळी दिलेल्या सूचने आवश्यकत्या पूर्तता करुन देण्याचे कंपनी/ मक्तेदारास अनिवार्य राहिल. त्याशिवाय कंपनी/ मक्तेदारास निविदा बयाणा आणि सुरक्षा अनामत रक्कम मक्तेदारास परत केली जाणार नाही. |
| | २०) महापालिका आर्थिक परिस्थिती पाहता निधी उपलब्धते नुसार क्रमांनुसार देयके अदा करणे बाबत विचार करण्यात येईल. सदर बाबी मुळे कामाच्या प्रगतीत कोणतीही बाधा येणार नाही, याची जबाबदारी कंपनी/ मक्तेदार यांची राहिल. |
| | २१) प्रस्तुत ई-निविदेतील कोणतीही अटी शर्ती कमी करणे, बदल करणे, शिथील करणे किंवा कोणतेही कारण न देता काही वा एकुण ई-निविदा फेटाळणे चा पुर्ण अधिकार आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, मालेगाव यांनी राखून ठेवलेले आहेत. |
| | २२) विषयांकित कामा बाबत भविष्यात लेखापरिक्षण आक्षेप निर्माण झाल्यास आक्षेपार्थ रक्कम कंपनी/ |

| | |
|---|---|
| | मक्तेदारा कडून वसूल करण्यात येईल. त्याबाबत कंपनी/ मक्तेदारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. |
| | २३) कामा वरील काम करता ना दुखापत झाल्यास कंपनी/ मक्तेदार यांचे कामगाराला वर्क मॅन कॉम्पेन्सेशन कायदा १९२३ ऍक्ट च्या तरतुदी नुसार भरपाई देणे कंपनी/मक्तेदारावर बंधनकारक राहिल. त्याबाबत महापालिका कोणतीही आर्थिक मदत करणार नाही. तत्राप कंपनी/मक्तेदाराने तसे न केल्यास ती रक्कम मक्तेदाराच्या देय रकमेतून वसूल करण्यात येईल. |
| | २४) कंपनी/ मक्तेदाराने नियुक्त कर्मचाऱ्यांना ओळखपत्र देणे, त्यांचा विमा काढणे, त्यांना किमान वेतन कायद्यानुसार वेतन तथा सर्व लाभ देणे, तसेच त्यांची नियमितपणे वैद्यकीय तपासणी करणे आणि कामगार कायद्यातील अस्तित्वातील सर्व तरतुदींची पूर्तता करणे मक्तेदारास बंधनकारक राहतील. तसेच त्यासंबंधी आवश्यक त्या पूर्तता करुन घेण्याची जबाबदारी कंपनी/ मक्तेदावर राहिल. भविष्यात काही समस्या निर्माण झाल्यास त्यांची पूर्तता कंपनी/ मक्तेदारास बंधनकारक राहिल. |
| | २५) कंपनी/ मक्तेदारास महापालिकेकडून कोणतीही रक्कम कोणत्याही कारणामध्ये जास्त गेली असल्याचे निदर्शनास आल्यास, सदर वसूल पात्र रक्कम कंपनी/मक्तेदाराच्या नावे महापालिकेत जमा असलेल्या कोणत्याही रकमेतून वसूल करण्यात येईल. त्याबाबत कंपनी/मक्तेदारास कोणतीही तक्रार करता येणार नाही. |
| | २६) कंपनी/ मक्तेदार यांनी कामावर कोणतेही बाल कामगारा कडून काम करता येणार नाही. तसे आढळल्यास संबंधित कंपनी/ मक्तेदारावर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल. |
| | २७) नियमानुसार सर्व शासकीय कर, देय होणाऱ्या रकमा इ. भरणे ची जबाबदारी कंपनीची राहील. तसेच प्रचलित नियमा प्रमाणे सर्व शासकीय कराची रक्कम कंपनी/ मक्तेदार यांच्या बिलातून कपात करण्यात येईल. |
| | २८) कंपनी/ मक्तेदार/निविदाकार यांच्या कडील ईएमडी/ सुरक्षा ठेवीवर कोणत्याही व्याजासाठी पात्र असणार नाही. |
| | २९) प्रस्तुत ई-निविदेतील कामा संदर्भात कोणतीही अधिकची माहिती/ तपशील वा मुद्दे/ अडचणी असल्यास या बाबतीत आस्थापना विभाग, मा.न.पा., मालेगाव येथे संपर्क साधावा. |
| **C)** | **<u>तांत्रिक लिफाफा (Technical Bid) करीता आवश्यक कागदपत्रे (Check List For Tender Documents)</u>** : खालील नमुद एकुण कागदपत्र/ प्रमाणपत्राची अद्यावत तथा साक्षांकित प्रत कंपनी/ मक्तेदार/ निविदाकार यांनी तांत्रिक लिफाफा (Technical Bid) मध्ये सादर करणे अनिवार्य राहील. |
| | १) ऑनलाइन पेमेंट गेटवेद्वारे अदा केलेली निविदा दस्तऐवज शुल्क (Tender Form Fee) आणि निविदा बयाणा रक्कम (EMD) पावती (payment receipt)ची स्कॅन केलेल्या स्वरुपातील प्रत |
| | २) संस्था/ कंपनी नोंदणी प्रमाणपत्र |
| | ३) कंपनीस/ मक्तेदारास महाराष्ट्रासह इतर दोन राज्यात व केंद्र शासना कडील शासकीय/ निमशासकीय पदभरतीच्या स्पर्धा परिक्षा राबविण्याचा किमान ५ वर्षाचा अनुभव असल्याचे दर्शविणारे प्रमाणपत्र/ कागदपत्रांची इ.साक्षांकित प्रत |
| | ४) कंपनीस/ मक्तेदारास किमान ५,००,००० उमेदवारांसाठी स्पर्धा परीक्षा राबविण्याचा अनुभव असल्याचे दर्शविणारे प्रमाणपत्र/ कागदपत्रांची साक्षांकित प्रत |
| | ५) संबंधित कंपनी/ मक्तेदारचे नांव मागील ५ वर्षात कोणत्याही राज्य शासनाच्या व केंद्र शासनाच्या कोणत्याही विभागाच्या काळ्या यादीत टाकण्यात आले नाही, कुठलाही गैरव्यवहार, गैरवर्तणूक केल्याचे दोषी आढळले नाही इ. संदर्भात रु. १००/- च्या गैर-न्यायिक स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र |
| | ६) स्पर्धा परीक्षा आयोजनासाठी संबंधित कंपनीने प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी परीक्षा आयोजित करण्याची क्षमता असल्याचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. |
| | ७) स्पर्धा परीक्षेच्या सुरक्षेच्या दृष्टिने आवश्यक त्या सर्व तांत्रिक बाबीची कंपनीने पुर्तता करणेस परिपुर्ण सक्षम असल्याचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र |
| | ८) स्पर्धा परिक्षा अत्यंत पारदर्शकपणे, विश्वासार्ह, गोपनीयता बाळगून, सुरक्षित रित्या व सुलभतेने पार पाडण्यासाठी आवश्यक असलेल्या इतर सर्व उपाययोजना करण्याची क्षमता कंपनीकडे असल्याचे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र |

| | |
|---|---|
| | ९) मालेगाव महानगरपालिका सोबत प्रस्तुत ई-निविदेतील कामा संदर्भात व्यवसाय/व्यवहार करण्यासाठी कंपनी/ निविदाकाराच्या जबाबदार व्यक्तीचे नामनिर्देशन करणारे पॉवर ऑफ अॅटर्नी/बोर्ड ऑफ रिझोल्यूशन/ अधिकृत पत्र इ. |
| | १०) सनदी लेखापालाने प्रमाणित केलेल्या परिशिष्ट-१ (Annexure-I) मध्ये दिलेल्या नमुन्यात सन २०१९-२०, २०२०-२१ आणि २०२१-२२ ह्या मागील ३आर्थिक वर्षांचे वार्षिक उलाढाल विवरण. |
| | ११) लेखापरीक्षकाद्वारे प्रमाणित सन२०१९-२०, २०२०-२१ आणि २०२१-२२ ह्या मागील ३आर्थिकवर्षांचे ताळेबंद आणि नफा-तोटा खात्यांच्या प्रती. |
| | १२) मागील तीन वर्षांचे आयकर प्रमाणपत्र |
| | १३) सेवा कर प्रमाणपत्र |
| | १४) पॅन कार्डाची प्रत |
| | १५) प्रोफेशनल टैक्स प्रमाणपत्र |
| | १६) ई.पी.एफ.क्रमांक बाबत कागदपत्र. |
| | १७) कंपनी/ निविदाकार/ मक्तेदाराचे मालेगाव महानगरपालिके मधील कुठल्याही अधिकारी/ कर्मचाऱ्यांशी हितसंबंध नाहीत, या बाबत चे रु.१००/- चे स्टँप पेपर वर प्रतिज्ञापत्र. |
| | १८) परिशिष्ट-२(Annexure-II)मध्ये दिलेल्या नमुन्यात प्रस्तुत ई-निविदा बाबत हमीपत्र |
| | १९) परिशिष्ट-४ (Annexure-III) मध्ये दिलेल्या नमुन्यात कंपनीशी संपर्क बाबत तपशील फॉर्म |
| D) | **<u>दर पत्रक लिफाफा (Commercial Bid):</u>**<br>येथे कंपनी/निविदाकार/मक्तेदाराने प्रस्तुत ई-निविदा दस्तऐवजात नमूद केल्याप्रमाणे फॉर्म बी-१ परिशिष्ट-४ (Annexure-IV) मध्ये विहीत केलेल्या नमुन्यात दर पत्रक (Commercial Bid) रीतसर सही शिक्क्या सहित स्कॅन करून ऑनलाइन दाखल (upload) करणे अनिवार्य आहे. तसेच यासहित वेबसाइट वरील दर पत्रक लिफाफा (Commercial Bid) पर्याया (option) वर उपलब्ध असलेल्या एक्सेल फॉरमॅटमधील BoQ मध्ये स्वतंत्रपणे तेच दरनमूद (entry) करून एक्सेल फॉरमॅटमधील BoQ वेबसाइटवरील दरपत्रक लिफाफा (Commercial Bid) पर्यायावर अपलोड करणे देखील अनिवार्य आहे. |
| E) | **<u>ई-निविदा उघडणे व निविदांचे मूल्यमापन:</u>**<br>१)ई-निविदा सूचनेमध्ये निर्दिष्ट केलेल्या तारखेला आणि वेळेस प्राप्त ई-निविदा उघडण्यासाठी पुढील प्रक्रिया अवलंबली जाईल. ज्यासाठी निविदा कारास स्वत: उपस्थित राहण्यास किंवा अधिकृत अधिकाऱ्याला त्याचा प्रतिनिधी म्हणून नियुक्त करता येईल.<br>२) मालेगाव महानगरपालिका निविदा समिती सदस्यां समोर सर्व प्रथम प्राप्त एकुण कंपनी/ मक्तेदार/ निविदाकार यांचे लिफाफा क्रमांक १ अर्थात तांत्रिक लिफाफाकंपनी/ निविदाकार/ त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत उघडण्यात येईल.<br>३) लिफाफा क्रमांक १ अर्थात तांत्रिक लिफाफा उघडण्याच्या वेळी कंपनी/ निविदाकार/ त्यांच्या प्रतिनिधी उपस्थितीत नसल्यास, तरीही त्यांच्या अनुपस्थितीत मालेगाव महानगरपालिका निविदा समिती सदस्यांसमोर प्राप्त एकुण लिफाफा क्रमांक १ उघडण्यात येईल.<br>४) महानगरपालिका निविदा समिती सदस्यांद्वारे निविदा अटी/ शर्तीस अनुसरून सर्व विहित अनिवार्य कागद पत्रांसह ई-निविदा प्रक्रियेद्वारे ऑनलाइन प्राप्त झालेल्या एकुण ई-निविदांच्या कागदपत्र/ प्रमाणपत्राची परीक्षण/ तपासणी करण्यात येईल. सदर समिती आवश्यक कागदपत्रांची पात्रता, वैधता, लागूता, अनुपालन आणि निविदेच्या दस्तऐवजात नमूद केलेल्या पात्रता/ निकषांसह पुष्टीकरणासाठी छाननी करेल.<br>५) प्राप्त झालेल्या सर्व ई-निविदांमध्ये संपूर्ण निविदा प्रक्रियेमध्ये कोणतीही संगनमत किंवा फसवणूक झालेली नसल्याची खात्री तथा विश्लेषण मनपा निविदा समितीद्वारे करण्यात येईल.<br>६) तांत्रिक छाननीत दस्तऐवजांचे पुष्टीकरण कंपनी/ मक्तेदारने केवळ ई-निविदा प्रक्रियेद्वारे ऑनलाइन सादर केलेल्या एकुण कागदपत्र/ प्रमाण पत्रांचे आधारे केली जाईल.<br>७) मूल्यमापन प्रक्रियेदरम्यान कोणतीही निविदा दस्तऐवजात नमूद केलेल्या निविदा अटींची पूर्तता करत नाही |

| | |
|---|---|
| | तर ती स्वीकार्य नाही म्हणून घोषित केली जाईल.आणि अशा निविदांचा पुढील मूल्यमापनासाठी विचार केला जाणार नाही.<br>८) प्राप्त प्रत्येक ई-निविदांचेस्वतंत्रपणे मूल्यमापन केले जाईल.<br>९) सदर तांत्रिक छाननी पूर्ण झाल्यानंतर तपसणीअंती अटी/ शर्ती पुर्ण करणा-या तसेच निविदा अटींशी पूर्णतः सुसंगत असलेल्या निविदा ह्या लिफाफा क्र. २ अर्थात दर पत्रक लिफाफा उघडण्यासाठी पात्र निविदा म्हणून घोषित केल्या जातील.<br>१०) नियमानुसार आवश्यक संख्येत एकुण निविदा पात्र कंपनी/मक्तेदार उपलब्ध झाल्यास, तरच केवळ पात्र कंपनी/मक्तेदारांचे लिफाफा क्रमांक २ अर्थात दर पत्रक लिफाफा उघडण्या संदर्भात नियमोचित कार्यवाही करण्यात येईल. अपात्र ठरलेल्या कंपनी/ मक्तेदरांचे लिफाफा क्रमांक २ उघडले जाणार नाहीत व यासंदर्भात कोणतीही मागणी वर विचारदेखील होणार नाही.<br>११) लिफाफा क्रमांक २ अर्थात दर पत्रक लिफाफा शक्यतो त्याचदिवशी उघडण्याचा प्रयत्न केला जाईल. मात्र काही अपरिहार्य परिस्थितीत लिफाफा क्रमांक २ उघडल्याच्या वेळ आणि तारखेत बदल झाल्यास, बदललेली वेळ आणि तारीख लिफाफा क्रमांक १ च्या पात्र निविदाकारांना स्वतंत्रपणे महानगरपालिके द्वारे इलेक्ट्रॉनिक पद्धतीने कळवली जाईल. |
| **F)** | **निविदांच्या वैधतेचा कालावधी :**<br>लिफाफा क्रमांक १ (तांत्रिक लिफाफा) उघडण्याच्या तारखेपासून १२० दिवसांच्या कालावधीसाठी ई-निविदा वैध राहतील. यापेक्षाकमी कालावधीसाठी प्राप्तवैध असलेली ई-निविदा नाकारली जाईल. |
| **G)** | **मंजुर देकार किंमत :**<br>उद्धृत केलेल्या आणि स्वीकारलेल्या किमती निवड झालेल्या कंपनी/ निविदा कर्त्यावर बंधनकारक असतील. व कामाचाकरारा वर स्वाक्षरी केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीसाठी वैध असतील आणि कराराच्या कालावधीत कोणत्याही वेळी, केंद्र किंवा राज्य सरकारच्या कोणत्याही कायद्याने किंवा कायद्याद्वारे किंवा वस्तु/कामाच्या किंमतीत वाढकेल्या गेल्यास, शासनाच्या वैधानिक कायद्यामुळे उत्पादन शुल्क/व्हॅट व इतर कोणत्याही कर अथवा शुल्क इ. मध्ये कोणतीही वाढ झाल्यास, किमतीत कोणतीही वाढ केली जाणार नाही. |
| **H)** | **कराराचा पुरस्कार:**<br>१) नियमानुसार निविदा संविदा मंजुरी करीता एकुण विहीत व नियमोचित कार्यवाही पुर्ण केल्यावर सक्षम प्राधिकरणाच्या मान्यतेने पात्र कंपनी/ निविदाधारकां पैकी सर्वात कमीदर सादर करणा-या कंपनी/ मक्तेदारास कार्यादेश प्रदान करण्याची कार्यवाही करण्यात येईल.<br>२) ई-निविदेतील कामांचा प्रमाण वाढवण्याचा किंवा कमी करण्याचा अधिकार महापालिका आयुक्त यांना राहील. व कोणतेही कारण न देता कामाचा कार्यादेश रद्द किंवा सुधारित करण्याचा किंवा सर्व निविदा किंवा निविदेचा काही भाग रद्द करण्याचा अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवलेले आहेत. |

मालेगाव महानगर पालिका मालेगाव

**(भालचंद्रगोसावी)**
**आयुक्त**
**मालेगावमहानगरपालिका, मालेगाव.**

## ANNEXURE-I

ANNUAL TURNOVER STATEMEMT FOR PAST THREE YEARS

The Annual Turnover of M/s. ______________________________ for the past three years are given below and certified that the statement is true and correct.

| Sr.No. | Year | Turnover Rs. |
|---|---|---|
| 1 | | |
| 2 | | |
| 3 | | |

**Date:**

**Seal** **Name & Signature of Auditor/Chartered Accountant**

# ANNEXURE- II

## Tender Undertaking/Declaration

To
The Municipal Commissioner,
Malegaon Municipal Corporation,
MMC Head Office, Near Malegaon Fort,
Raviwar Ward, Malegaon – 423203,
Dist. Nashik, Maharashtra.

Dear Sir,

Having examined the tender document of "appointment of a company for the process of permanent recruitment by direct service for various vacant posts in Group-A, Group-B (Non-Gazetted), Group-C and Group-D at the establishment of Malegaon Municipal Corporation", the receipt of which is hereby acknowledged, We, the undersigned, offer our best and specified services under the above-named Contract in full conformity with the said relevant tender document and our financial offer in the Price schedule submitted online in Envelop No. 2 which is made part of this tender.

We undertake,if our tender is accepted, to deliver the goods in accordance with the delivery schedule specified in the tender document.

We agree to abide by this tender, for the Tender Validity Period specified in the tender document and it shall remain binding upon us and may be accepted by you at any time before the expiration of that period.

Until the formal final Contract is prepared and executed between us, this tender together with your written acceptance of the tender and your Acceptance of Tender, shall constitute abinding Contract between us. We understand that you are not bound to accept the lowest or any tender you may receive.

Signed:________________________________ Date: ____________

In the capacity of ______________________________________

Duly authorized to sign this bid for and on behalf of______________________

**Signature & stamp of tenderer**

**Note : This declaration must be signed & Stamped in original and the same must be submitted to this office alongwithall required doucuments uploaded in technical envelope & signed Tenderdocument within 48 hours from the date of online submission of e-tender on specified website.**

## Annexure - III

CONTACTDETAILSFORM

1. NAME OF THE COMPANY :

2. NAME AND DESIGNATION OF AUTHORISED REPRESENTATIVE :

3. COMMUNICATION ADDRESS :

4.PHONE NO./MOBILE NO. :

5. FAX :

6.E-MAIL I.D. :

PARTICULAR DETAILS OF THE BIDDER'S REPRESENTATIVE

1.NAME OF THE CONTACT PERSON :

2.DESIGNATION :

3. PHONE NO. :

4.MOBILE NO. :

5. E-MAIL I.D. :

UNDERTAKING

1. I, the undersigned certify that I have gone through the terms and conditions mentioned in the bidding document and undertake to comply with them.
2. The rates quoted by me are valid and binding upon me for the entire period of contract.
3. I/We give the rights to the competent authority of the Office of the Commissioner, Malegaon Municipal Corporation, Malegaon to forfeit the Earnest Money/Security money deposit by me/us in case of breach of conditions of Contract.
4. I hereby undertake to provide the services as per the directions given in the tender document/contract agreement.

Date :
Place :

Signature of the Authorised Signatory
Designation :

(Office seal of the Bidder)

**ANNEXURE-IV**

# MALEGAON MUNICIPAL CORPORATION, MALEGAON

## Establishment Department

## Form B-I

E-Tender Notice No.MMC/Est/01/2022-23

Name of Work : **"Appointment of a company for the process of permanent recruitment by direct service for various vacant posts in Group-A, Group-B (Non-Gazetted), Group-C and Group-D at the establishment of Malegaon Municipal Corporation"**

I / We,hereby tender for the execution for Malegaon Municipal Corporation, of the work specified above, within the Time specified, in accordance in all respect with the specifications,designs, drawings and instructions, as follows.

| Sr. No. | Item Description | Qty. | Units | BASIC RATE in Figures to be entered by the Bidder (Rs.) | TOTAL AMOUNT with all types of Taxes (Rs.) | TOTAL AMOUNT in Words (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मालेगाव महानगरपालिकेच्या सुचने नुसार विविध पदां करीता विहीत भरती प्रक्रिया अंतर्गत उमेदवारांकडून प्राप्त झालेले अर्ज स्वीकारणे, त्याची छाननी करणे, आलेल्या अर्ज संकलित करुन अर्हता तपासणीचे परिपुर्ण नियोजन, परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने स्वीकारणे, अर्जावर योग्य ती प्रक्रिया करुन ऑनलाईन प्रवेशपत्र तयार करणे, महापालिकेच्या सुचनेनुसार विविध केंद्रावर परिक्षा घेणे, परीक्षेचा निकाल तसेच शिफारस झालेल्या व न झालेल्या उमेदवारांच्या याद्या संकेतस्थळावर जाहीर करणे,पद भरती व्यवस्थापन इत्यादी अनुषंगिक बाबी/कामे पुर्ण करणे, स्पर्धा परिक्षेसाठी प्रश्न संच तयार करणे, मनपाकडुन प्राप्त सुचनेनुसार इतर संबंधित कामे पार पाडणे इत्यादी कामांसाठी प्रति उमेदवारासाठी सर्व करासहित दर सादर करणे. | 1.00 | Per Application | | | |
| 2 | मालेगाव महानगरपालिकेच्या सुचने नुसार विविध पदां करीता विहीत भरती प्रक्रिया अंतर्गत उमेदवारांकडून प्राप्त झालेले अर्ज स्वीकारणे, त्याची छाननी करणे, आलेल्या अर्ज संकलित करुन अर्हता तपासणीचे परिपुर्ण नियोजन, परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने स्वीकारणे, अर्जावर योग्य ती प्रक्रिया करुन ऑनलाईन प्रवेशपत्र तयार करणे, महापालिकेच्या सुचनेनुसार विविध केंद्रावर परिक्षा घेणे, परीक्षेचा निकाल तसेच शिफारस झालेल्या व न झालेल्या उमेदवारांच्या याद्या संकेतस्थळावर जाहीर करणे,पद भरती व्यवस्थापन इत्यादी अनुषंगिक बाबी/कामे पुर्ण करणे, स्पर्धा परिक्षेसाठी प्रश्न संच तयार करणे, मनपाकडुन प्राप्त सुचनेनुसार इतर संबंधित कामे पार पाडणे इत्यादी कामांसाठी प्रति उमेदवारासाठी सर्व करासहित दर सादर करणे. **(प्रश्न पत्रिका तयार करणे हा घटक वगळुन)** | 1.00 | Per Application | | | |

Sign of Contractor Co.

| Sr. No. | Item Description | Qty. | Units | BASIC RATE in Figures to be entered by the Bidder (Rs.) | TOTAL AMOUNT with all types of Taxes (Rs.) | TOTAL AMOUNT in Words (Rs.) |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | मालेगाव महानगरपालिकेच्या सुचने नुसार विविध पदां करीता विहीत भरती प्रक्रिया अंतर्गत उमेदवारांकडून प्राप्त झालेले अर्ज स्वीकारणे, त्याची छाननी करणे, आलेल्या अर्ज संकलित करुन अर्हता तपासणीचे परिपुर्ण नियोजन, आवेदन शुल्क ऑनलाईन पद्धतीने स्वीकारणे, अर्जावर योग्य ती प्रक्रिया करुन ऑनलाईन प्रवेशपत्र तयार करणे, महापालिकेच्या सुचनेनुसार विविध केंद्रावर मुलाखत घेणे संदर्भात परिपुर्ण नियोजन करणे, एकुण प्रक्रिया अंती निकाल तसेच शिफारस झालेल्या व न झालेल्या उमेदवारांच्या याद्या संकेतस्थळावर जाहीर करणे, पद भरती व्यवस्थापन इत्यादी अनुषंगिक बाबी/ कामे पुर्ण करणे, मनपाकडुन प्राप्त सुचनेनुसार इतर संबंधित कामे पार पाडणे इत्यादी कामांसाठी प्रति उमेदवारासाठी सर्व करासहित दर सादर करणे. | 1.00 | Per Application | | | |

I / We agree that measurement of the work will be taken according to the usual methods use in the Malegaon Municipal Corporation. The decision of Commissionerin this regard will be final and will be binding on us.

I / We agree that the offer shall remain open for acceptance for a minimum period of 120 days from the date of opening and thereafter until it is withdrawn by me/us by notice in writing duly addressed to the authority opening the tenders.

I / We agree that the amount of Earnest Money shall not bear interest and shall be liable to be forfeited to the Municipal Corporation if I/We fail to abide by the stipulation to keep the offer open for period mentioned above or sign & complete the contract documents as required by the Commissioner/ or his competent authority with the time limit laid down by the Authority.

I / We agree that the quoted rates are the total rate for completed item of the works as per the specifications and shall be inclusive of all incidental charges, if any.

I / We have quoted the rate supportingall taxes and duties, GST, work contract tax etc. and no payments on account of any increase / duties / taxes etc. during the implement period will be demanded.

In the event of the tender being submitted by a firm, it must be signed separately by each partner therof or in the event of the absence of any partner, it shall be signed on his behalf by a person holding a power of attorney authorizing him to do so.

I / We understood that the officer competent to dispose of the tenders shall have the right of rejecting all or any of the tender without assigning any reason thereof.

**Name and Signature of Authorised Person with Seal**

---

## For Office Use Only